## जागतिक इंटरनेट दिन

29 ऑक्टोबर हा जागतिक इंटरनेट दिवस म्हणून जगभरात साजरा केला जातो भारतात 1995च्या सुमारास इंटरनेट उपलब्ध झालं 29 ऑक्टोबर 1969 रोजी इंटरनेटवरचा जगातला पहिला संदेश ऑनलाइन पाठवण्यात गेला विज्ञानाच्या दृष्टीने हे वर्ष क्रांतिकारी वर्ष होते म्हणूनच 29 ऑक्टोबर या तारखेला जागतिक इंटरनेट दिन म्हणून संबोधले जात



दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

अगदी सरळमार्गी असणे
हेही एक प्रकारचे पापच आहे...
हे पाप कालांतराने मनुष्याच्या
दुर्बलतेचे कारण बनते...
- स्वामी विवेकानंद


वर्ष : ०५ | अंक : ७५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.२९ ऑक्टोबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## सत्तेचा उपयोग जनतेसाठीच : सुजित झावरे

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.२८, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील वासुंदे, ढवळपुरी वनकुटे, खडकवाडी पळशी या भागात मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज राहतो या समाजाला मुख्य प्रवाह आणण्यासाठी प्रयत्न करत असून सर्वसामान्य जनतेला व ग्रामीण भागाला विकासात्मक दिशा देण्यासाठी सत्तेच्या माध्यमातून काम करत असून या पुढील काळात सत्तेचा उपयोग जनतेच्या विकासासाठी करणार असल्याचे मत जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी व्यक्त केले.

वासुंदे येथील शिक्री ते ठाकरवाडी रस्त्याच्या मजबुतीकरण व डांबरीकरण कामाला सुजित झावरे पाटील यांच्या विशेष प्रयत्नांमुळे मंजुरी मिळाली. या रस्त्याच्या भूमिपूजन समारंभाचा शुभारंभ जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते नुकताच संपन्न झाला. हा रस्ता पूर्ण झाल्यास शिक्री, ठाकरवाडी, बोकनकवाडी लाखेवस्ती आणि परिसरातील आदिवासी वाडीवस्त्यांना जोडला जाईल, ज्यामुळे वाहतूक सुकर होऊन स्थानिकांना मोठा फायदा होईल.

कार्यक्रमादरम्यान, सुजित झावरे पाटील यांनी स्वखर्चातून शिक्री, ठाकरवाडी, बोकनकवाडी तसेच परिसरातील आदिवासी बांधवांना जातीचे दाखले वाटप केले. यामुळे आदिवासी समाजाला शासकीय योजनांचा लाभ घेणे सोपे होणार आहे. तसेच, देवकृपा फाउंडेशनच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना फराळ वाटप करून दिवाळी सण साजरा करण्यात आला. या उपक्रमाने सणासोबत सामाजिक बंध मजबूत झाले.

यावेळी वासुंदे व परिसरातील सरपंच, उपसरपंच, चेअरमन, व्हाइस चेअरमन, मान्यवर मंडळी आणि परिसरातील आदिवासी बांधव, महिला वर्ग, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फेब्रुवारीमध्ये जागतिक स्तरावरील 'मुंबई क्लायमेट वीक'चे मुंबईत आयोजन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२८, मुंबई :** वातावरणीय बदल आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात भारताचे नेतृत्व अधोरेखित करणारी मुंबई वातावरण सप्ताह – 'मुंबई क्लायमेट वीक' ही जागतिक स्तरावरील परिषद पुढच्या वर्षी फेब्रुवारीमध्ये मुंबईत होणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

हा महत्त्वाकांक्षी उपक्रम 'प्रोजेक्ट मुंबई' या संस्थेच्या संकल्पनेतून साकारला जात असून महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. मंत्रालयातील समिती कक्षात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी या उपक्रमाची घोषणा केली. यावेळी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे, महापालिका आयुक्त भूषण गगराणी, विभागाच्या सचिव जयश्री भोज, प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी आदी उपस्थित होते.

विकसनशील देशांतील वातावरणीय बदल, अन्न व ऊर्जा टंचाईच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून विकास आणि पर्यावरणीय कृती यांच्यात संतुलन साधण्यासाठी तो प्रभावी भूमिका बजावेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

मुंबई क्लायमेट वीकचा मुख्य कार्यक्रम १७ ते १९ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे पार पडेल. त्याचबरोबर या कार्यक्रमात नागरिकांना सहभागी होता यावे, यासाठी शहरभर विविध प्रदर्शने, कार्यशाळा, चित्रपट, कला, क्रीडा, आरोग्य आणि अध्यात्म यांच्याशी निगडीत उपक्रम, आणि क्लायमेट फूड फेस्टिव्हल सारखे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या परिषदेत ग्लोबल साऊथमधील ३० पेक्षा अधिक देशांमधील प्रतिनिधी सहभागी होणार असून यामध्ये व्यवहार्य असा हवामान बदल कृती कार्यक्रम तयार करण्यात येईल. विशेष म्हणजे हा कार्यक्रम राज्यांचे मुख्यमंत्री, विविध शहरांचे प्रतिनिधी, उद्योग, सामाजिक संस्था, विद्यार्थी आणि युवक यांच्या सहभागातून तयार करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली. यावेळी फडणवीस यांच्या हस्ते मुंबई क्लायमेट वीकच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. तसेच या उपक्रमाची चित्रफीत यावेळी दाखविण्यात आली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई हवामान सप्ताह कृतीसह नेतृत्व करण्याच्या भारताच्या दृढनिश्चयाचे प्रदर्शन करतो. माननीय पंतप्रधानांनी ठरवलेल्या दृष्टिकोनातून प्रेरित होऊन, मुंबई आणि महाराष्ट्र जागतिक दक्षिणेसाठी न्याय्य, नाविन्यपूर्ण, चांगल्या निधीसह हवामान भविष्य घडवण्यास मदत करण्यास तयार आहेत.

ग्लोबल साउथमधील वातावरणीय कृती आणि सहकार्य या क्षेत्रामधील भारताचे नेतृत्व सिद्ध करणारे मुंबई क्लायमेट वीक हे मोठे व्यासपीठ ठरणार आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईत पहिल्यांदाच मुंबई क्लायमेट वीक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. आता कृती करण्याची वेळ आली आहे.

यासाठी आपण समाजातील प्रत्येक व्यक्तीला, प्रत्येक व्यवसायाला आणि जीवनाच्या सर्व स्तरांना हवामान बदलाच्या परिणामांविरुद्ध मोहिमेत सहभागी व्हावे लागणार आहे. तसेच त्यांना कृतींद्वारे हे बदल कसे कमी करायचे हे प्रत्यक्षात सांगावे लागणार आहे. मुंबई क्लायमेट वीक कार्यक्रम आयोजित केल्यानंतर आपल्याला महाराष्ट्र आणि मुंबईसाठी बेंचमार्क देखील निश्चित करावे लागतील, हवामान बदलाच्या क्षेत्रात कृती करण्यासाठी काही ध्येये निश्चित करावी लागतील. त्यासाठी आजपासून कृती सुरू करूया असेही ते म्हणाले.

तीसहून अधिक देशांमधील अभ्यासक, पर्यावरण तज्ज्ञ, आणि धोरणकर्ते मुंबई क्लायमेट वीकच्या व्यासपीठावर एकत्र येऊन वातावरणीय बदलावरच्या सर्वंकष आणि व्यवहार्य उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न करतील. हा उपक्रम भारत आणि विकसनशील राष्ट्रांचा आवाज जागतिक स्तरावर पोहोचविणारा ठरेल, असेही ते म्हणाले.

## भाजपला नाही कळलं, तर संघाला तरी.. बच्चू कडूंनी आंदोलन करण्यामागचं कारण सांगितलं

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.२८, नागपूर :** शेतकरी कर्जमाफी, दिव्यांग, मच्छीमार, मेंढपाळ, ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या विविध मागण्यांसाठी प्रहार संघटनेचे अध्यक्ष आणि आमदार बच्चू कडू यांनी पुन्हा एकदा सरकारविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. नागपुरात त्यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनामुळे शहरातील अनेक प्रमुख रस्त्यांवर वाहतूक कोंडी झाली आहे.

बच्चू कडू यांनी आज माध्यमांशी बोलताना सांगितले, आम्ही देवेंद्रजींच्या घरी जाणार होतो, पण इथे रस्ता जाम आहे. आणि देवा भाऊनी सांगितले की जेवणाची व्यवस्था नाही, म्हणून आम्ही त्यांच्या घरी जाण्याचा कार्यक्रम रद्द केला. मात्र, आम्ही सरकारला गेल्या आठ महिन्यांपासून सतत निवेदनं देत आलो आहोत. किमान १५ वेळा आम्ही सरकारसमोर मागण्या ठेवल्या, पण काहीही प्रतिसाद मिळाला नाही. ते पुढे म्हणाले, या सरकारकडे शेतकऱ्यांसाठी, दिव्यांगांसाठी, मच्छीमारांसाठी, मेंढपाळांसाठी आणि ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसाठी वेळ नाही. पण आज अचानक बैठक बोलवली गेली, हे कस शक्य आहे? सरकारचं धोरणच शंका उत्पन्न करणारं आहे. मी फडणवीस साहेबांना निवेदन आणि मेसेज पाठवले. आम्ही आमचे मुद्दे 'अ' आणि 'ब' स्वरूपात मांडले आहेत. त्या मागण्यांवर निर्णय घेतल्याशिवाय आम्ही मागे हटणार नाही. आज नागपूर शहर जाम झालं आहे, त्याची तुम्हाला काळजी वाटते. पण आमचं आयुष्य जाम झालं आहे, त्याचं काय? असा प्रश्न बच्चू कडू यांनी उपस्थित केला.

ते पुढे म्हणाले, दररोज आठ ते दहा शेतकरी आत्महत्या करत आहेत. सरकारला ते दिसत नाही का? आम्हाला कोणत्याही नागरिकाला त्रास द्यायचा नाही, पण आमचं ऐकण्यासाठी सरकारला मजबूर करावं लागेल. कडू यांनी सांगितले की, आम्हाला जी जागा दिली ती आम्ही नाकारली आहे. आम्ही रस्त्यावरच थांबणार आहोत. आता आंदोलन पंजाबच्या धर्तीवर होईल.

वर्ष लागले तरी आम्ही येथेच बसायची तयारी ठेवली आहे.आमदार कडू यांनी आठवण करून दिली की, आम्ही गेल्या आठ महिन्यांपासून संघर्ष करत आहोत. पायदळ मोर्चा काढला, अन्नत्याग आंदोलन केलं, पण सरकारच्या कानावर काहीच पडले नाही. आज अचानक बैठक बोलवून सरकार आम्हाला अडकवण्याचा प्रयत्न करत आहे.

तसेच आमच्या बावीस मागण्या आहेत, त्यात शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करणे, योग्य हमीभाव देणे, दिव्यांग, मच्छीमार आणि ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा समावेश आहे. काही मागण्यांसाठी तर पैशांची गरजही नाही, फक्त परिपत्रक काढण्याची आवश्यकता आहे. नागपूरमध्ये आंदोलन का केले, याबाबत ते म्हणाले, सर्व आंदोलन मुंबईत का करायचे? नागपूरात देवा भाऊ आणि नितीन भाऊ आहेत. नागपूर हे देशाचं केंद्र आहे. आरएसएसचं मुख्यालय इथे आहे. त्यामुळे जर भाजपला नाही कळलं, तर संघाला तरी कळावं म्हणून आम्ही नागपूरातच आंदोलन करत आहोत. बच्चू कडू यांच्या या इशाऱ्यामुळे नागपूरातील राजकीय वातावरण तापले असून, प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

## पुण्यातील आर्थिक गुन्हे शाखेत तक्रार : खेळाडूंच्या आंदोलनाला यश

### अखेर 'एमओए'चे महासचिव नामदेव शिरगावकरांवर गुन्हा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२८, मुंबई :** महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचे (एमओए) महासचिव नामदेव शिरगावकर यांच्या विरोधात आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांवरून अखेर पुण्यातील आर्थिक गुन्हे शाखेचे सहायक पोलिस आयुक्त विवेक मासाळ यांनी गुन्हा दाखल केला आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने वारंवार हिशेब सादर करण्यास सांगितले होते. मात्र, त्यांनी ती मुदत संपल्यानंतरही हिशोब सादर केलेला नाही. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष संदीप भोंडवे यांच्या तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष संदीप भोंडवे यांनी दिलेल्या माहितीनुसार, आर्थिक गुन्हे शाखेचे सहायक पोलिस आयुक्त विवेक मासाळ यांच्याकडे नामदेव शिरगावकर याच्या विरोधात तक्रार दाखल केली होती.संदीप भोंडवे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले की, महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन ही राज्यातील सर्व खेळांची प्रमुख संघटना असून,ती भारतीय ऑलिंपिक असोसिएशनशी संलग्न आहे.या संघटनेचे महासचिव नामदेव शिरगावकर यांनी स्वतःचे नातेवाईक आणि जवळच्या व्यक्तींना एकत्र करून अनेक खेळ संघटना स्थापन केल्या असून,त्या संघटनांमार्फत आर्थिक देवाणघेवाण केली जात असल्याचा आरोप आहे. शासनाकडून मिळणारा निधी अपहार करून स्वतःच्या फायद्यासाठी वापरण्याची ही त्यांची पद्धत असल्याचे भोंडवे यांनी म्हटले आहे.



महाराष्ट्र शासनाने नॅशनल गेम्ससाठी महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनला मोठा निधी दिला होता. सप्टेंबर २०२२ मध्ये नॅशनल गेम्ससाठी तीन कोटी ५० लाख रुपये, ऑक्टोबर २०२३ मध्ये गोवा नॅशनल गेम्ससाठी चार कोटी रुपये आणि जानेवारी २०२५ मध्ये उत्तराखंड नॅशनल गेम्ससाठी चार कोटी ९५ लाख रुपये, असा एकूण १२ कोटी ४५ लाख रुपयांचा निधी शासनाने दिला होता; परंतु या खर्चाचा योग्य हिशोब नामदेव शिरगावकर यांनी शासनास सादर केलेला नाही. यामुळे क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने २६ सप्टेंबर रोजी शिरगावकर यांना कारणे दाखवा नोटीस बजावून ३ ऑक्टोबरपर्यंत हिशेब सादर करण्यास सांगितले होते.मात्र,त्यांनी ती मुदत संपल्यानंतरही हिशोब सादर केलेला नाही.

**पुण्यातील आंदोलनाला यश !**

पार्श्वभूमीवर संदीप भोंडवे यांच्या नेतृत्वाखाली २७ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ आणि काही खेळाडूंनी पुण्यातील पोलिस आयुक्तालयासमोर आंदोलन केले. आंदोलनात महासचिवांवर गुन्हा दाखल करून योग्य तपास करावा, अशी मागणी करण्यात आली.शेवटी पोलिसांनी हा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## अजित पवार यांची राष्ट्रवादी पक्ष कार्यालयातील लावणीच्या व्हिडीओवर प्रतिक्रिया

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२८, मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या नागपूर कार्यालयात मारलेल्या लावणीच्या ठुमक्याने राज्यभर धुमाकूळ घातल्यानंतर, महिला पदाधिकाऱ्यांनी पुढे येऊन बचावाचा प्रयत्न केला. 'लावणी हा महाराष्ट्रातील लोककलेचा प्रकार आहे, तो चुकीचा कसा असेल?' असा सवाल करीत, लावणी ज्या ठिकाणी केली ती जागा मात्र चुकीची होती,' अशी सारवासारव केली. यानंतर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. आमदार सना मलिक यांच्या मतदारसंघात पक्षप्रवेशाच्या कार्यक्रमाला अजित पवारांनी हजेरी लावली. यावेळी कार्यकर्त्यांना संबोधित करताना अजित पवार यांनी अप्रत्यक्षपणे लावणीच्या व्हिडीओ भाष्य केलं. त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना मोलाची सूचना केली. आपल्याकडून कोणतीही चूक करु नका. कायदा हातात न घेता काम करावं, असा कानमंत्र अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना दिला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तुम्ही सदस्य झालेले असल्यामुळे, या परिवाराचे घटक झालेले असल्यामुळे आपण आपल्याकडून कुठली चूक होऊ देऊ नका. कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करु नका. संविधानाचा आदर करा. आपण विकासाच्या कामांवर एकमेकाला सहकार्य करत राहू. कुठेही सर्वसामान्यांवर अन्याय होत असेल तर तो दूर करण्याकरता आपण एकमेकांना साथ देऊ, असं अजित पवार म्हणाले.




**नेमकं प्रकरण काय?**

नागपुरात दिवाळी स्नेहमिलन कार्यक्रमाच्या निमित्ताने, राष्ट्रवादीच्या नव्या कोऱ्या कार्यालयात छोटेखानी कार्यक्रम झाला. त्यात काही लोकांचे सत्कार झाले. त्याच वेळी एका नृत्यांगणेने लावणी सादर केली. पदाधिकाऱ्यांनी टाळ्या, शिट्या वाजविल्या. तो व्हिडीओ वायुवेगाने राज्यभर व्हायरल झाला. राज्यात अतिवृष्टी झाली असताना, शेतकरी संकटात असताना सत्ताधारी पक्षाच्या कार्यालयात लावणीचे ठुमके लावणे योग्य नसल्याच्या प्रतिक्रिया उमटू लागल्या. त्याची गंभीर दखल घेत, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी शहराध्यक्ष अनिल अहिरकर यांना कारणे दाखवा नोटीस बजावत, लेखी उत्तर मागितले. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी बॅकफुटवर गेले. त्यांनी महिला पदाधिकाऱ्यांना समोर करून आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न केला.

महिला शहराध्यक्ष सुनीता येरणे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडली. पक्ष कार्यालयातील दिवाळी मिलनाचा कार्यक्रम हा पक्षाचा घरगुती कार्यक्रम होता. तेथे पक्षाच्या कार्यकर्त्यांसोबतच सामाजिक स्तरावर कार्य करणाऱ्या व्यक्तींचाही सत्कार करण्यात आला. सगळीकडे खेळीमेळीचे वातावरण होते. तेव्हा पक्षाच्या काही कार्यकर्त्यांनी अंगभूत कला सादर करण्याची विनंती केली. कार्यकर्ती नृत्यांगणा शिल्पा शाहीर यांनीही आपली लावणी सादर करण्याची इच्छा बोलून दाखविली, असं सुनीता येरणे म्हणाल्या.




## जागतिक इंटरनेट दिन

आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट आज सर्वांच्या जीवनातील अविभाज्य घटक बनला आहे. इंटरनेट शिवाय कोणी राहू शकत नाही एकवेळ माणूस अन्नापाण्याशिवाय राहील पण इंटरनेटशिवाय नाही इतकी इंटरनेट आज जीवनावश्यक गोष्ट बनली आहे. आपला इंटरनेट पॅक अचानक संपला तर आपली काय अवस्था होते हे तपासून पहा. असं कोणतेच क्षेत्र नाही जिथे इंटरनेटचा वापर होत नाही सर्वच क्षेत्रात इंटरनेटचा वापर केला जातो म्हणूनच इंटरनेट आपल्या जीवनातील अविभाज्य भाग बनला आहे. भारतात १९९५ च्या सुमारास इंटरनेट उपलब्ध झालं मात्र असलं तरी त्याच्या कितीतरी आधी अमेरिकेत आणि युरोपात इंटरनेटचा वापर केला जात होता. २९ ऑक्टोबर १९६९ रोजी इंटरनेटवरचा पहिला संदेश पाठवला गेला म्हणूनच २९ ऑक्टोबर हा दिवस जागतिक इंटरनेट दिवस म्हणून मानला जातो . इंटरनेटवर पहिला संदेश पाठवला त्याला आज बरोबर ५६ वर्ष पूर्ण झाली. या ५६ वर्षात इंटरनेटमुळे जगात अनेक क्रांतिकारी बदल झाले मात्र इंटरनेटवर पहिला संदेश कसा पाठवला गेला हे पाहणे खूप मनोरंजक आहे. १९६० चा दशकात अमेरिका आणि रशिया यांच्यात शीतयुद्ध चालू होते अमेरिकन सैन्याला इंटरनेट व्यवस्था सारखी गुप्त व्यवस्था संदेशवहनासाठी हवी होती. अशी यंत्रणा स्थापन करण्यासाठी अमेरिकन संरक्षण खात्याने एका संशोधन प्रकल्पाला मोठ अर्थसहाय्य देऊन अमेरिकेतील काही विद्यापीठाकडे त्या संशोधनाचे काम सोपवल. या प्रकल्पासाठी एकूण चार संगणक अमेरिकेतील चार विद्यापीठात जोडण्यात आले. त्या चार संगणकातच जगातील पहिलं इंटरनेट होत. या चार संगणकांपैकी एक होता कोलिफॉर्निया लॉस एंजेलिस विद्यापीठात, दुसरा होता स्टॅनफोर्ड विद्यापीठात तिसरा होता सांता बार्बरा विद्यापीठात तर चौथा होता उता विद्यापीठात. एका संगणकातून दिला जाणारा संदेश इंटरनेटद्वारे दुसऱ्या संगणकात पोहचतो असे संशोधन या प्रकल्पातील तज्ज्ञांनी केले होते त्याची चाचणी या चार संगणकाद्वारे केली जाणार होती. अर्थात त्याकाळी आजच्या इतके प्रगत तंत्रज्ञान नव्हते. संगणकाचे मॉनिटर तर हिरव्याजर्द अक्षरांनी चमकणारे असत. कॉलिफॉर्नियामध्ये चार्ली क्लीने या संगणकप्रणाली निर्मात्याने एका संगणकावरून दुसऱ्या संगणकाला एकेक्ट्रोनिक संदेश पाठवला. पहिल्या वेळी पाठवलेल्या log in शब्दापैकी lo शब्द पोहचल्यावर सिस्टीम फेल झाली. पुढील अक्षरे पोहचू शकली नाहीत मात्र अर्धवट का होईना संदेश पोहचला ही बाब दूरसंचार आणि तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती घडवणारी ठरली. हा दिवस माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सुवर्ण दिन ठरला. म्हणूनच २९ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक इंटरनेटदिन म्हणून साजरा केला जातो.

## कुबड्यांची गरज नाही, मित्र पक्षांची झोप उडाली, महाराष्ट्रात काय होणारं ?

आगामी काळात होवू घातलेल्या पंचायत समिती, जिल्हा परिषद, महापालिका अशा सर्व स्थानिक निवडणुकांच्या तोंडावर प्रत्येक राजकीय पक्षातर्फे सत्ता हस्तगत करण्यासाठी तयारीला लागले आहेत. मात्र मुंबईच्या चाव्या कोणाकडे हे जरी आता सांगता येत नसले तरी सर्वचजण ठणकावून सांगत आहेत. आम्हीच मुंबईच्या तख्तावर झेंडा फडकावणार. त्यामूळे निवडणुकीच्या रणांगणातील लढाईला महत्व प्राप्त झाले आहे. हि निवडणूक प्रतिष्ठेची आणि अस्तित्वाची ठरणारं आहे. कोण जिंकणार कोण हरणार हे येणारा काळच ठरवेल. काँग्रेसकडून एकला चलो रे चा नारा दिला जात आहे. तर नुकताच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा मुंबईला एका कार्यक्रमाला आले असता भाजपाला कुबड्यांची गरज नसून महाराष्ट्रात भाजपा स्वबळावर भक्कमपणे उभा असल्याचे निक्षून सांगितले आहे. त्यामूळे मित्रपक्षांची झोप उडाली आहे. तिकडे राज आणि उद्धव ठाकरेंचा निर्णय होईना. महाविकास आघाडीचे काय सांगता येईना. त्यामूळे सर्वच राजकीय पक्षांकडून स्वबळाची तयारी सुरु आहे की काय असे वाटत आहे. काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होतील असे राजकीय वर्तुळातून बोलले जात आहे. सद्या महाराष्ट्रात अनेक मुद्दे गाजत आहेत. तर काही मूलभूत गरजांची सोडवणूक करणे अपेक्षित आहे. त्यामुळे राजकीय पक्ष येणाऱ्या काळात कोणत्या प्रकारे निवडणुकीला सामोरे जातात आणि आपल्या बाजूला मतदार राजाला कसे वळवितात ते पहाणे मोठे रंजक ठरणारं आहे !

**- राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

# सवंगड्याच्या मैफिलीतील उबदार शेकोटी !

इंग्रजी दिनदर्शिकेनुसार आणि ऋतुमानानुसार साधारण ऑक्टोबर महिन्याअखेर किंवा नोव्हेंबरच्या पहिल्यांदा आठवड्याच्या सुरुवातीस थंडीची चाहूल लागते. वातावरणातील हा बदल लक्षात घेऊन आई घरातील कपड्याच्या गाठोड्यातून स्वेटर, मफलर, कानपट्ट्या, टोप्या धुवायला काढायची. त्यावेळेस आताच्या सारखा कापडांचा बाजार जागोजागी नव्हता. मोठ्या बहिण-भावाचे लहान बहीण भावाला कितीतरी वर्ष तेच ते उबदार कपडे घालावे लागायचे. मात्र त्यातही खूपच माया व प्रेम होते. कसलीही कुरकुर न करता आनंदाने घालायचो.गावाकडे आजूबाजूला शेतीचे व निसररमम्य वातावरणा मुळे थंडी बऱ्याच प्रमाणात असायची. सकाळी भल्या पहाटे छान मंदिरातून घंटांचा आवाज यायचा. कार्तिक महिन्यास प्रारंभ चालू झाल्यास कार्तिक स्नान व गावात दिंडी निघायची.त्यामुळे गावातील बाया माणसं सर्वजण सकाळी लवकर उठायचे त्यामुळे आम्हा पोरांनाही उठावंच लागायचं. चुलीवरील गरम-गरम पाण्याने अंघोळ केली की, कोवळ्या उन्हाची वाट बघायचो.मात्र सूर्योदयापूर्वी फारच थंडी वाजायची, म्हणून वाळलेलं गवत, काडी-कचरा वावरातील कपाशीच्या, मिरच्याच्या काड्या जमा करायचो आणि पेटलेल्या चुलीतील एखाद्या विस्तावाचा तुकडा सराट्यावर घेऊन जमा केलेल्या शेकोटीच्या वस्तुंना लावून शेकोटी पेटवायचो.

गावाकडील गरिबीच्या परिस्थितीमुळे अंगभर उबदार कपडे सगळ्यांकडे नसायचे. त्यात आम्हा मुलांना हाफ चड्ड्या असायच्या. त्यामुळे थंडी जाणवायची. महिला व पुरुष मंडळींना सुद्धा कानाला पांढरा रुमालाव्यतिरिक्त थंडीचे संरक्षण म्हणून दुसरे काही नसायचे. सूर्योदयापर्यंत एकदम सकाळी व रात्री साधारण जेवणानंतर थंडी जाणवायला लागली की शरीराला उब मिळावी म्हणून शेकोटी पेटवून बसायचो .एका-एका गल्लीमध्ये जवळपास दोन ते चार शेकोट्या पेटवलेल्या दिसायच्या.जेथे ज्याचे विचार जुळले तेथील घोळक्यात जाऊन बसायचे. शक्यतो आम्हा लहान मुलांची शेकोटी वेगळी व मोठ्या बायका-माणसांची वेगळी असायची. त्यातील एक गट कि, ज्यांना बिडीपीण्याची सवय होती. त्यांना शेकोटीमुळे माचीस वापरायचं कामच नव्हतं, कारण बिडी शेकोटीतील विस्तवावर धरली की पेटवल्या जायची.हे एक विशेष. शेकोटीवर जो शेकायला येईल त्याला थोडी-थोडी शेकोटी पेटवायच्या वस्तू सोबत घेऊन याव्या लागायच्या. आम्ही



गावाकडे त्याला सासू म्हणायचं. शेकोटीसाठी आणलेल्या गवत, काड्या, लाकडांना सासूच का म्हणावं? अजूनही प्रश्न अनुत्तरीत आहे. प्रश्न असा आहे की, सासू मग ती मुलाची किंवा मुलीची सुद्धा असू शकते. शेकोटीवर उब घ्यायला जर मुलगा आला तर भविष्यातील त्याच्या पत्नीची आई म्हणजे सासू. आणि मुलीने आणले तर तिच्या पतीची आई म्हणजे सासूच. यामधील तर्क अद्यापही लक्षात आला नाही. शेकोटीत जाळणाऱ्या वस्तूंना सासूच का म्हणतात. एवढी वाईट असते का सासू? बरं ! एवढं वाईट म्हणावं तर ती स्वतःला जाळून इतरांना थंडीपासून संरक्षण देते. उब देते. म्हणजे सासू वाईट नसतेच मुळी..! कारण ती आई असतें. मग ती मुलाची असो अथवा मुलीची. गमतीचा भाग वगळता, एखाद्या वस्तूसाठी ठेवलेलं नाव हे गंमतीने जरी लोकरूढितून, जनमानसातून आपल्यापर्यंत आले असले तरी, त्याचा अर्थ गहन असतो.

थंडीच्या दिवसात शेकोटी पेटवण्यासाठी जमवलेल्या गुराढोरांचे व बकऱ्यांचे खाऊन उरलेले गवत, काडी-कचरा सुद्धा असायचा. अर्थात त्या जळणाऱ्या वस्तू कि ज्यातून आग, विस्तव निर्माण होईल त्या आम्ही मुलं शेकोटीसाठी घराच्या पडक्या भिंतीच्या बाजूला जमा करून ठेवायचो. सकाळी जवळपास पाच ते सहा वाजता घरच्यांनी अंथरुणातून उठवून दिल्यावर आम्ही तेच काम करायचो. कारण चुली जवळ जास्त वेळ बसू शकत नव्हतो. अन अंथरुणात लोळत पडल्यास सक्त मनाई होती. एवढ्या सकाळी उठून अभ्यास करावा म्हटलं तर, तेवढे हुशार गटातील आम्ही मुळीच नव्हतो आणि करायचे म्हटलं तरी कुडकुडणाऱ्या थंडीत अभ्यासात मन लागायला तर हवं. म्हणून शरीराला उब मिळावी म्हणून शेकोटीचाच आनंद लुटायचो. त्यानिमित्ताने मित्रमंडळी सोबत खेळण व्हायचं. गप्पा चालायच्या. प्रत्येक जण शेकोटीवर शेकायला येण्याअगोदर थोडं थोडं तरी शेकोटी पेटवण्यासाठी साहित्य सोबत घेऊन यायचेच. अन्यथा त्याला बसू देत नव्हते. ते अगदी सहाजिक होतं. जर शेकोटीची उब घ्यायची तर सगळ्यांना आणायलाच हवे.गावाकडील



**- विनोद जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

शेकोटीची हीच तर खरी गंमत असायची.कोणतीही गोष्टी ही सगळे मिळून सहभागी होऊन करायचे. त्यामुळे एकमेकाविषयी आपुलकी, प्रेमाची भावना राहायची. एकलकोंडेपणा नव्हता. मग ती शेकोटी असो अथवा दिवाळीचा फराळ...! घरी रात्रीचे जेवण आटोपल्यावर मकाच्या कणसाच्या आतील भागापासून शेकोटी बनवायचो. त्याला आम्ही लेंडुरं म्हणायचो. आई त्याला लोखंडी टोपल्यामध्ये टाकून पेटवायची. त्याचीही घरगुती शेकोटी बनायची. त्यामुळे घरातील वातावरण रूम हीटर प्रमाणे उबदार व्हायचे.

शेकोटी पेटवल्यावर सर्वजण घोळक्याने गोल रिंगण करून बसायचे. शेकोटी विझायला लागली की, परत त्यावर काडी कचरा टाकून पेटवायचो. धूपट-धुवा यामुळे अंग पूर्ण काळसर पडायचे. मात्र त्याची कोण पर्वा करणार. काळ्या-गोऱ्याचा प्रश्नच नव्हता. शेकोटीतून मिळणारा आनंद महत्त्वाचा होता. आता असं वाटतं. स्वेटर, कान-टोपी, मफलर विकत घ्यायची परिस्थिती नव्हती. अन हो कदाचित नव्हती ते एका दृष्टीने बरच होतं. कारण सगळ्यांनीच थंडीचे उदार कपडे विकत घेतले असते. थंडी जाणवली नसती आणि मित्रांसोबत शेकोटीची आनंद अनुभवता आला नसता. मित्रांसोबतच्या मैफिलीचा आनंद लुटता आला नसता. हल्ली शेकोटी वगैरे कुठे बघायला मिळते. सगळ्यांकडे उच्च दर्जांचे उबदार कपडे, पायात पायमोजे, जोडे, कान-टोप्या बघायला मिळत आहे. असं बरच काही असून केवळ घरातल्या घरात भ्रमणध्वनी मध्ये मुलं गुंतून असतात. एवढेच काय! काही घरांमध्ये वातानुकूलक यंत्र आहे. ऋतुमानानुसार जेव्हा थंड हवे तेव्हा थंडी हवा. जेव्हा उब हवी तेव्हा उब ही त्यातून मिळवता येते. त्यामुळे अशी शेकोटी पेटवायचे मजा कोण घेईल? शेकोटीसाठी कचरा, काडी गवत लाकडे कोण जमा करणार? अन हो! पेटवलीच तर शेकोटीचा आनंद उपभोगायला येईल कोण? कारण प्रत्येक अबाल वृद्ध यंत्रमानवासारखी झाली आहेत. स्वतःला कुठल्या ना कुठल्या कामात व्यस्त करून घेतलं आहे. या जबाबदारीच्या अन मुलांकडून भविष्यातील वाढत्या अपेक्षामुळे मुले इतकी एकलकोंडी होत चालले आहे कि, त्यांच्या भावनिक विकास होताना दिसत नाही. त्यातून त्यांचं नैराश्य वाढत आहे. चेहऱ्यावरील खळखळणारा आनंद हरवला आहे. लोकांतापेक्षा एकांत वाढल्यामुळे त्यांची समाज, मित्र, नातेवाईक यांचे विषयी प्रेम आपुलकी दिसून येत नाही. कारण शेकोटीतून मिळणाऱ्या शारीरिक उबेसह मित्राबरोबर गोड गप्पांच्या मैफिलीतून मनाला उब मिळवून देणाऱ्या या व्यवस्था लुप्त होताना दिसून येत आहे.

अशा या शेकोटीतून थंडीपासून संरक्षण म्हणून अंगभर मिळणाऱ्या उबेसह मित्रमंडळी आणि सवंगड्या बरोबरच्या गप्पा-गोष्टीतून व खळखळ हास्यातून मनालासुद्धा ऊब मिळायची. एकलकोंडेपणाची भावना कमी होऊन, समूहातून आनंद मिळायचा. मित्रमंडळीमध्ये वाटून घेतलेल्या सुखदुःखातून जगण्याला बळ यायचं.कारण ही शेकोटी फक्त शरीराला उब देत नव्हती तर, खळखळून हसायला लावणारे, प्रेम, आपुलकी माया, सहकार्यची जाणीव करून देणारं हक्काचे प्लॅटफॉर्म होते. मित्रांनो! तर चला पुन्हा एकदा उबदार प्रेमाची शेकोटी पेटवूया. या गार वातावरणात थंडीपासून संरक्षण मिळावे म्हणून शेकोटीच्या या ऊबदारपणातून शरीराबरोबर सवंगड्यांच्या गप्पा, गोष्टीं अन मैफिलीतून या एकलकोंड्या मनालाही उबदार बनवूया.

## लक्तरे...

प्रत्येक समाज का
रे रस्त्यावरतीउतरे
अस्वस्थता कारण
शोधावी खरीउत्तरे

उकिरडे पडे उघडे
किती टाकी अत्तरे
सुव्यवस्थेची पुरती
टांगलीजाई लक्तरे

चुकीचीपीके पेरली
कायदे करी सक्त रे
अंतस्थकारण कसे
का होई आसक्त रे

बंधननाही कुणाला
सगळेइकडे मुक्त रे
शंकायेते काहीवेळा
बदलू पाही तख्त रे

जनभावनाजाणावी
कसे उसळते रक्त रे
उद्रेकी मार्गांनेच का
सर्व होतात व्यक्त रे

आंदोलनाची हत्यारे
भले असो सशक्त रे
राजकारण घुसेजसे
होऊ लागे अशक्त रे

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# ए.आय. गुन्हेगारी वाढते आहे !




डिजिटल युगात 'ए.आय.' अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेने मोठ्या प्रमाणात क्रांती घडवून आणली आहे ज्यामुळे आज घंटोका काम मिनिटोमें आणि मिनिटोंका काम सेंकंदोमे होऊ लागले आहे. आज अनेक क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सर्रासपणे केला जात आहे. वित्त, आरोग्य, शेती, बांधकाम, उद्योग, शिक्षण आदी माध्यमांत कृत्रिम बुद्धिमत्तेने शिरकाव केला आहे. प्रत्येकाच्या 'मोबाईल'मध्ये 'डाउनलोड' केलेले जवळपास सर्वच 'अँप्स' कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करताना दिसून येतात सामाजिक माध्यमांवर सुद्धा कृत्रिम बुद्धिमतेचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे.

मोबाईलवर एखादी 'रील' आपण संपूर्ण पाहिली की त्यापुढच्या रिल्स सुद्धा त्याच विषयाच्या संदर्भातील माहिती देणाऱ्या आपल्या 'मोबाईल'वर येऊ लागतात. यामागे सुद्धा कृत्रिम बुद्धिमत्तेचाच हात असतो. भारतात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढला, तर जसा 'डिजिटल' युगाचा कायापालट होईल तसे 'डिजिटल' गुन्हेगारीहीचेही प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढेल अशी शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली होती. आज ते सत्यात उतरताना दिसत आहे. याच कृत्रिम बुद्धिमत्तेने हरियाणातील एका १९ वर्षीय तरुणाचा जीव घेतल्याचे वृत्त नुकतेच वाचनात आले.

महाविद्यालयाच्या द्वितीय वर्षात शिकणाऱ्या राहुल भारती नावाच्या तरुणाचा मोबाईल 'हॅक' करण्यात आला आणि लगेचच त्याच्या व्हाट्सपवर त्याचे आणि त्याच्या तीन बहिणींचे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून मॉर्फ केलेले नग्न फोटो आणि व्हिडीओज येऊ लागले. हे फोटो आणि व्हिडीओज सामाजिक संकेतस्थळांवर प्रसारित न करण्यासाठी त्याच्याकडे पैशांची मागणी केली जाऊ लागली, ज्यामुळे तो प्रचंड तणावात गेला. या तणावाखालीच त्याने आत्महत्या करून आपले जीवन संपवले. राहुलच्या व्हाट्सअप चॅटच्या आधारे राहुलला ब्लॅकमेल करणाऱ्या तिघांना अटक केली असून त्यामध्ये त्याचा एक मित्रसुद्धा सहभागी झाला असल्याचे उघड झाले आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून एखाद्याचा चेहरा 'मॉर्फ' केला जातो आणि 'डिपफेक'द्वारे व्हिडीओ बनवले जातात. अशा छायाचित्रांचा आणि व्हिडीओजचा गुन्हेगारांकडून ब्लॅकमेलिंगसाठी किंवा एखाद्याला बदनाम करण्यासाठी वापर केला जात असल्याची प्रकरणे मागील काही महिन्यांत मोठ्या प्रमाणात घडली आहेत. रश्मीका मंदाना, अक्षय कुमार, कुमार सानू यांसारखे कलाकारही यातून सुटलेले नाहीत. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून एखाद्याचा चेहरा तर बदलला जातोच याशिवाय खोटा आवाज तयार करून ब्लॅकमेलिंग केले जाते, खोटी सही तयार करून बँक खाते रिकामे केले जाते, चोऱ्या केल्या जातात, फसवणूक केली जाते. 'आमचा अँप डाउनलोड करा आणि तुमच्या मोबाईलमधून कोणतेही दोन चेहरे निवडून त्यांचा एकमेकांचे चुंबन घेताना किंवा आलिंगन देताना व्हिडीओ तयार करा !' अशा प्रकारची जाहिरात आज सामाजिक संकेतस्थळांवर खुलेआम केली जात आहे.

अशा प्रकारच्या व्हिडीओला सत्य मानून एखाद्याच्या सुखी संसारात विष कालवले जाऊ शकते, एखाद्याचे आयुष्य उध्वस्त होऊ शकते. राहुल भरतीचा जीव गेला तसा अन्य कुणाचा जाऊ नये यासाठी अशाप्रकारच्या छायाचित्रांवर किंवा व्हिडीओजवर कोणीही सहज विश्वास ठेवू नये, त्यामागील सत्यता पडताळावी, जाणकारांचे आणि आवश्यक तिथे पोलिसांचे साहाय्य घ्यावे. सरकारने सुद्धा अशा प्रकारची छायाचित्रे आणि व्हिडीओ बनवणाऱ्या अँप्सवर निर्बंध आणायला हवेत !

भारतात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढला मात्र त्याचा वापर करण्याबाबत नैतिक धोरण आखले गेलेले नाही, त्याच्या गैरवापराविषयी वेगळे कठोर कायदे करण्यात आलेले नाहीत ज्यांची आज नितांत आवश्यकता आहे.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## ज्येष्ठ पत्रकार संजय पंडित यांना राज्यस्तरीय लोकराजा शाहू पुरस्कार जाहीर



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२८, कोल्हापूर :** नाभिक समाजातील ज्येष्ठ समाजसेवक,नाभिक समाज भूषण, निर्भीड पत्रकार तथा ख्यातनाम समाज प्रबोधनकार संजयजी राजाराम पंडित यांना पत्रकारिता आणि कुशल समाज संघटन या क्षेत्रात करीत असलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल शाहु महोत्सव २०२५ च्या वतीने निर्भीड पत्रकारिता व कुशल समाज संघटक कार्यासाठी मानाचा राज्यस्तरीय लोकराजा शाहु पुरस्काराने गौरविण्यात येत असून हा पुरस्कार वितरण सोहळा, रविवार दिनांक ३० नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता, रोटरी क्लब, दातेमळा, महेश सेवा संमती जवळ, इचलकरंजी ता. हातकणंगले जि. कोल्हापूर येथे संपन्न हाणार आहे. तसेच त्यांच्या लेखनातून समाज प्रबोधनाचे कार्य अविरत पणे सतत सुरू असते संजयजी पंडित यांना हा पुरस्कार मिळाल्या बद्दल कळंब तालुका आणि राज्यभरातील विविध संघटना, नाभिक महामंडळ आणि समाजातील कार्यकर्त्यांकडून त्यांचे अभिनंदन होत असून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## मुलींच्या नावे ५०००डिपॉझिट करुन जन्माचे स्वागत



**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२८, उदगीर (लातूर) :** सतत सामाजिक , शैक्षणिक व सांस्कृतीक कार्यात आग्रेसर असलेल्या रंगकर्मी प्रतिष्ठान उदगीरच्या वतीने विराळ ता.जळकोट येथिल गावात जन्मलेल्या मुलींच्या नावे ५००० डिपॉझिट करुन मुंलीचा जन्माचे स्वागत राष्ट्रमाता जिजाऊ ज्ञानज्योती साविञीबाई फुले विराळची लाडकी लेक उपक्रमाचा शूभारंभ विराळ येथील श्री समर्थ धोंडूतात्या मंदिर येथे प्रगती अनिता प्रल्हाद सोनटक्के , स्नेशा विशाल सोनटक्के, रेवा प्रज्ञा मुकेश वाघमारे या तीन नवजात मुलींच्या आई वडिलांना चेक व साडीचा आहेर करुन जन्माचे स्वागत करुन शुभारंभ करण्यात आला. यावेळी जळकोटचे तहसीलदार राजेश लांडगे गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, ज्ञानोबा जाधव, नर्सिंग सोनटक्के प्राचार्य संजय येरनाळे, लक्ष्मणराव एकलारे, शिवशंभ सोनटक्के, तानाजी सोनटक्के, दिगंबर सोनटक्के, अंकुश मद्रे, पोलीस कॉनेस्टेबल महेश मुसळे, अंबादास जाधव, बळीराम सोनटक्के, संतोष पवार, मुख्याध्यापक तातेराव वाघमारे, रंगकर्मीचे अध्यक्ष बिभीषण मद्देवाड, सचिव ज्योती मद्देवाड कवडेकर, उपाध्यक्ष सिद्धार्थ सूर्यवंशी, रामदास केदार, सचिन शिवशेट्टे, लक्ष्मण बेंबडे, प्रल्हाद येवरीकर, हणमंत केंद्रे, नागनाथ गुट्टे, संदीप निडवदे, शरद पवार, धोंडीबा श्रीमंगले, सुनिल वाघमारे, रमेश मद्देवाड आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुञसंचलन शिवशंकर सोनटक्के यांनी केले तर आभार निलकंठ सोनटक्के यांनी मानले . सामाजिक आर्थिक सांस्कृतीक कारणामुळे समाजातील मुलींचे घटणारे प्रमाण थांबावे व मुलीचे शिक्षण, आरोग्य व आभिमान यासाठीमदत व्हावी तसेच तिच्या शिक्षण, उच्च शिक्षण वा स्वावलंबनासाठी उपयोगात आणली जाणार आहे. रंगकर्मी प्रतिष्ठानच्या या अनोख्या पावलामुळे समाजात कन्येचा जन्म म्हणजे अभिमानाचा क्षण हा सकारात्मक संदेश जाणार आहे. लाडकी लेक मुदत ठेव योजना कन्येच्या जन्माचा आनंद आता सन्मान, शिक्षण आणि सुरक्षिततेच्या रूपाने महत्वाचे ठरणार आहे.

## शेतकरी साईनाथ खानसोळे यांच्या समर्थनार्थ भव्य मोर्चा



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२८, मुदखेड (नांदेड) :** काल २७ रोजी तालुक्यातील वासरी येथील शेतकऱ्यांने अतिवृष्टीत बाधित शेतकऱ्यांच्या खात्यात दिवाळीपूर्वी पैसे जमा न झाल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांने चक्क तहसीलदार मुदखेड यांची गाडीच फोडली होती महसूल कर्मचाऱ्यांनी साईनाथ मारोती खानसोळे या शेतकऱ्याला पोलीसांच्या ताब्यात दिले नायब तहसीलदार मारोती जगताप यांनी रितसर पोलीस ठाण्यात तक्रार दिली रात्री गुन्हा दाखल करण्यात आल असल्याने शेतकरी साईनाथ खानसोळे यांच्या सुटकेसाठी सर्व पक्षीय मोर्चा काढून शासनाचा निषेध केला आहे.

वासरी तालुका मुदखेड येथील शेतकरी साईनाथ खानसोळे यांनी दिवाळीपूर्वी घोषित केलेले अनुदान मिळाले नसल्याने शेतकऱ्यांची दिवाळीवर दुखाचे सावट असल्याची खंत मनात होती. शेतकऱ्यांचा आक्रोश लक्षात घेऊन रागाच्या भरात तहसिल आवारात तहसीलदारांच्या गाडीची फावड्याने तोडफोड केली या घटनेनंतर तहसिल प्रशासनाच्या वतीने शासनाच्या दबावानंतर शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा ठपका ठेवून राजकिय द्वेषातून गुन्हा नोंदविण्यात आला आहे या घटनेनंतर पोलिसांनी शेतकऱ्याला पोलिस ठाण्यात डांबून ठेवले आहे या घटनेच्या निषेधार्थ काँग्रेस , शिवसेना ठाकरे गट,शेतकऱ्यांच्या विविध संघटनेकडून दि..२८ मंगळवार रोजी भव्य मोर्चा काढण्यात आला होता.

जय जवान जय किसान तसेच शासनाच्या विरोधात घोषणा देत शेतकऱ्यांची सुटका करण्यात यावी यासंदर्भात मोर्चा धडकला गुन्ह्यातील जाचक कलमा रद्द करून शेतकऱ्यांची सुटका करण्यात यावी या आशयाचे लेखी निवेदन तहसिलदार आनंद देऊळगावकर यांना देण्यात आले आहे याबाबत सकारात्मक विचार करु असे आश्वासन सर्वपक्षीय शिष्टमंडळाला देण्यात आले आहे.

यावेळी भोकर विधानसभेचे युवा नेतृत्व पप्पू कोंडेकर, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बालाजी गाडे, काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रतापराव देशमूख, शहाराध्यक्ष कैलास गोडसे, माजी नगराध्यक्ष राजबहादूर कोत्तावार, कांग्रेस कार्याध्यक्ष मोहम्मद गौस, माजी उपाध्यक्ष करीम खां साब, संतोष गव्हाणे, उबाठा तालुकाप्रमुख पिंटू पाटील वासरीकर, जिल्हा उपप्रमुख माणिक लोमटे, माजी नगरसेवक उमाकांत घोंगडे, जिल्हा सहसचिव गिरीष कोत्तावार, रिसर्च काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष माधव हामंद, युवक तालुकाध्यक्ष प्रशांत मुंगल, युवक काँग्रेसचे अध्यक्ष मुजीब पठाण, अतीख अहेमद, अविनाश चौंदते, सोमनाथ चंद्रे, आकाश सोनटक्के, वेदांत शेवटे, शहराध्यक्ष, ऋषीकेश चौंदते, गजानन संबोड यांच्या सह सर्व पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्ते सर्व शेतकरी संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते तालुक्यातील सर्व शेतकरी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा मिळणार : आमदार काशिनाथ दाते

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, पारनेर (अहिल्यानगर) :** लोणी मावळा उपकेंद्रात ५ मेगावॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प आजपासून कार्यान्वित करण्यात आला असून या प्रकल्पाच्या माध्यमातून सबंधित उपकेंद्रांतर्गत असलेल्या शेतकऱ्यांना आता रोज सकाळी ९ ते संध्याकाळी ५ या वेळेत दिवसा अखंड वीजपुरवठा केला जाणार असल्याने मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या शेतीपंपासाठी दिवसा वीजपुरवठा करण्याचे पाहिलेले स्वप्न यानिमित्ताने साकार होणार असल्याचे मत पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी व्यक्त केले.



या प्रकल्पाचा लाभ लोणी मावळा, रांधे, दरोडी, गारखिंडी या गावातील संपूर्ण शेतकऱ्यांना तसेच पाबळ, वाजेवाडी व नरसाळेवाडीच्या काही भागातील शेतकऱ्यांना होणार असून, लवकरच म्हसोबा झाप, टाकळी ढोकेश्वर, जवळा, निघोज व खडकवाडी आदी गावांत सौरऊर्जा प्रकल्पांची प्रगतीपथावर असलेली कामे पूर्णत्वास जाऊन त्या त्या परिसरातील शेतकऱ्यांनाही अखंडितपणे दिवसा वीजपुरवठा करण्यात येईल. दिवसा वीजपुरवठा करण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांना पिकांना पाणी देण्यासाठी रात्रीच्या वेळी बिबट्या वा तत्सम जंगली श्वापदांच्या हल्ल्यांमुळे निर्माण होणाऱ्या अडचणींमधून मोठा दिलासा मिळणार असून बळीराजावरील संकटावर पर्याय शोधण्यात यश आल्याचे मनस्वी समाधान असल्याचेही आमदार दाते यांनी यावेळी सांगितले.


सौर ऊर्जेचा वापर करून वीज निर्माण करायची व त्याच्या आधारे कृषी पंप चालवायचे अशी ही योजना आहे. त्यासाठी मतदारसंघात विविध ठिकाणी विकेंद्रित स्वरुपात सौर ऊर्जा निर्मिती केंद्रे उभारण्यात येत आहेत. यामुळे शेतक-यांना दिवसा भरवशाचा वीज पुरवठा होण्यासोबत स्वस्तात वीज उपलब्ध करण्याची संधी भविष्यात मिळणार आहे. या योजनेमुळे कृषी क्षेत्राला मोलाची मदत करण्यासोबतच ग्रामीण भागातील उद्योगांनाही प्रोत्साहन मिळणार आहे. या प्रकल्पामुळे पारनेर तालुक्यातील ऊर्जाक्षेत्रात नव्या युगाची सुरुवात झाली असून, शाश्वत शेतीकडे एक पाऊल पुढे टाकले गेले आहे.

> शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित व भरवशाचा वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत आहे. त्यापैकी ५ मेगावॅट क्षमतेचा राळेगणसिद्धी नंतर पारनेर तालुक्यात सौरऊर्जेवर चालणारा हा पहिलाच प्रकल्प असून, पर्यावरणपूरक आणि शाश्वत ऊर्जेकडे वाटचाल करण्याच्या दिशेने टाकलेले हे एक महत्वाचे पाऊल आहे. शेतकऱ्यांच्या सोयीसाठी आणि ऊर्जेच्या बचतीसाठी मतदारसंघात ह्या पद्धतीचे प्रकल्प उभारण्यात येत असून पुढील काळात त्यावर अधिकाधिक भर दिला जाणार आहे. सौरऊर्जेचा वापर करून दिवसा वीजपुरवठा हा तालुक्यातील शेती विकासासाठी आदर्श उपक्रम ठरणार असून यानिमित्ताने कृषी क्रांतीच्या वाटचालीला दिशा देण्यासाठी महत्वाची भूमिका बजावली जाणार आहे.
>
> – आ. काशिनाथ दाते
> (विधानसभा सदस्य)

# संशयाचे भूत !

वृत्तपत्रात एकाच दिवशी मन सुन्न करणाऱ्या दोन घटना वाचनात आल्या. एक घटना मुंबईतील काळाचौकी परिसरात घडलेली. सकाळी साडेनऊच्या सुमारास एका तरुणाने त्याचीच प्रेयसी असलेल्या तरुणीवर भररस्त्यात सपासप वार करून तिचा जीव घेण्याचा प्रयत्न केला आणि नंतर तोच सुरा स्वतःच्या गळ्यावर फिरवून स्वतःही आत्महत्या केली, तर दुसऱ्या एका घटनेत पिंपरी चिंचवड शहरातील एका सामाजिक कार्यकर्त्याची त्याच्याच पत्नीने कापडाने गळा आवळून हत्या केली.

या दोन्ही घटना समाजमनाला हादरवणाऱ्या होत्या. दोन्ही घटनेत हत्या झालेली व्यक्ती आणि हत्या करणारे दोघेही एकमेकांच्या अत्यंत जवळचे होते. मुंबईतील घटनेत जीव गेलेले प्रेमी युगुल होते ज्यांचा नुकताच 'ब्रेकअप' झाला होता, तर पिंपरी चिंचवडमधील दोघे एकमेकांचे पती-पत्नी होते. एकमेकांवर कधीकाळी जिवापाड प्रेम करणारे, एकमेकांसोबत आयुष्य काढण्याच्या आणाभाका घेणारे आणि सुखी संसाराची स्वप्ने पाहणारी ही जोडपी यांच्यामध्ये नक्की काय बिनसले ज्यामुळे त्यांच्यातील संतापाने इतके उग्र स्वरूप धारण केले



ज्यामधून जोडीदाराचा जीव घेण्याइतपत टोकाचे पाऊल उचलले गेले. अर्थात दोन्ही घटनांमध्ये एक सामायिक बाब होती ती म्हणजे 'संशय'. मुंबईतील मनीषा यादव आणि सोनू बरई दोघांचे एकमेकांवर खूप प्रेम होते; मात्र काही दिवसांपासून मनीषा इंस्टाग्रामवर दुसऱ्या एका तरुणाला 'फॉलो' करू लागल्याने मनीषा आणि सोनू यांच्यात वाद होऊ लागले.

आठवडाभराच्या वादानंतर दोघांनी 'ब्रेकअप' केले; मात्र त्यानंतरही मनात राग ठेवून सूडाच्या भावनेने पेटून उठलेल्या सोनुने मनीषावर जीवघेणा हल्ला केला. सोनूच्या मनात संशयाचे विष चढल्याने त्याने हा टोकाचा निर्णय घेतला. पिंपरी चिचंवड येथील घटनेत सुद्धा 'संशय' हाच या घटनेमागील मुख्य सूत्रधार होता. परिसरात सामाजिक कार्यकर्ता म्हणून ख्याती असलेल्या आनंद भोईरला पत्नी चैत्रालीच्या चारित्र्यावर संशय येऊ लागला ज्यामुळे पती पत्नीमध्ये वाद होऊ लागले. घटनेच्या दिवशीही पहाटे अडीच - पावणेतीनच्या सुमारास दोघांमध्ये कडाक्याचे भांडण झाले ज्यामध्ये रागाच्या भरात चैत्राली हिने आनंद याच्या गळ्याभोवती कापड आवळून त्याची हत्या केली.

दोन्ही घटनांमध्ये जोडीदाराच्या चारित्र्यावर संशय आल्याने वाद निर्माण झाले आणि वादाचे पर्यवसान खून करण्यापर्यंत झाले. दोन्ही घटनांत निर्माण झालेले संशय किती खरे आणि किती खोटे याचा शोध पोलीस घेतीलच. मात्र केवळ संशयाने तिघांचे नाहक जीव मात्र गेले. प्रेमी युगुल असो वा पती-पत्नी यांतील नाते टिकवायचे असेल आणि ते बहरायचे असेल, तर प्रेमासोबत एकमेकांवर दृढ विश्वास असणे नितांत गरजेचे आहे कारण खरे नाते हे विश्वासावरच टिकते आणि फुलते. एकदा विश्वासाला तडा गेला कि नात्यामध्ये दरी निर्माण व्हायला वेळ लागत नाही आणि ही दरी निर्माण करण्याचे काम करतो तो 'संशय' ! नात्याची वीण जर घट्ट असेल आणि जोडीदाराशी सुसंवाद असेल तर तिथे संशयालाही जागा उरत नाही. संशयाने प्रवेश करण्याचा प्रयत्न केलाच तर सुसंवादाने त्याचे निरसनही वेळीच होते. मात्र अशावेळी दोघांनी डोके शांत ठेवून सामंजस्याने वागणेही महत्वाचे ठरते. विज्ञानाने केलेल्या प्रगतीमुळे बदललेले राहणीमान, प्रत्येकाच्या हातात आलेले 'स्मार्ट फोन्स', त्यावर मिळणारा 'अनलिमिटेड डाटा', सर्वांसाठी फुकटात खुली असलेली सामाजिक माध्यमे, त्यातून निर्माण होणाऱ्या ओळखी आणि ओळखींमधून वाढत जाणारा संवाद कुठेतरी रक्ताच्या नातेवाईकांपासून, जीवास जीव देणाऱ्या मित्रपरिवारापासून दूर नेणारा ठरू लागला आहे. एका निरीक्षणानुसार आजमितीला होणाऱ्या प्रत्येक ३ घटस्फोटांपैकी एक घटस्फोट सामाजिक माध्यमांमुळे होतो. आता तर त्याही पुढे जाऊन खूनसुद्धा होऊ लागले आहेत. नात्यांतील गोडवा टिकण्यासाठी सामाजिक माध्यमांच्या वापरावर स्वतःहून निर्बंध घालणे आज गरजेचे बनले आहे !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

## महिलेच्या खुन्यास पनवेल शहर पोलिसांनी केले जेरबंद

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२८, पनवेल :** दिनांक २५/१०/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. घर नं. ४७१, कुंडेवहाळ, ता. पनवेल, जिल्हा - रायगड या ठिकाणी एका महिलेचा गळा आवळून खून झाला असल्याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यास माहिती प्राप्त झाली.

त्यावरुन पनवेल शहर पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ सदर ठिकाणी जाऊन खात्री केली असता सदर ठिकाणी एक महिला, नामे संगिता नामदेव म्हात्रे, वय ५५ वर्षे, राहणार घर नं.४७१, मु.पो. कुंडेवहाळ, तुकाराम महाराज मंदिर रोड, ता. पनवेल, जिल्हा रायगड या मयत अवस्थेत आढळून आल्या.

तसेच सदर ठिकाणी केलेल्या चौकशीमध्ये मयत महिलेच्या अंगावरील सोन्याचे दागिनेही चोरी झाले असल्याची माहिती मिळाली. त्यावरुन मयत महिलेचा मुलगा सनी नामदेव म्हात्रे वय ३६ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारी वरुन यातील मयत महिलेचा कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी करण्याच्या उद्देशाने गळा दाबून खून केला असल्याची फिर्याद नोंद करून पनवेल शहर पोलीस ठाणे गुन्हा




रजि नं. ६३६/ २०२५ भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१), ३३१ (८) प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे.

सदर गुन्ह्याच्या घटनास्थळी कोणतेही सीसी टिव्ही फुटेज, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसल्याने आरोपीताबाबत माहिती मिळवणे अत्यंत अवघड जात होते. त्यामुळे वरिष्ठांच्या आदेशाने गुन्ह्याच्या तपास कामाकरिता वेगवेगळी पथके तयार करण्यात आली होती. त्याप्रमाणे घटनास्थळ परिसरातील रहिवाश्यांकडे चौकशी करण्याची कामगिरी महिला सपोनि प्रज्ञा मुंढे, सपोनि सारिका झांझुणें, पोउपनि प्रियांका शिंदे व महिला अंमलदार, पोशि/ विशाल दुधे यांना देण्यात आली होती. महिला पथकाने व पोशि विशाल दुधे यांनी अत्यंत कौशल्यपुर्ण परिसरातील सुमारे ३० महिला व पुरुष यांच्याकडे तपास केला. त्यामध्ये इसम नामे मोहम्मद समीर अल्लाउद्दीन अन्सारी वय २३ वर्षे, धंदा डेअरी दुकान, राहणार. कुंडेवहाळ, तुकाराम मंदिराजवळ, पनवेल, जिल्हा रायगड याच्याकडे केलेल्या तपासादरम्यान त्याने यातील मयत महिलेस ४० हजार रुपये उसणे दिले होते. आरोपीताने सदर रक्कम परत मिळणेकरीता मयत महिलेकडे वारंवार मागणी केली होती.

दिनांक २४/१०/२०२५ रोजी रात्री दिलेली रक्कम परत मागण्याकरीता मयत महिलेच्या घरी गेला असता मयत महिलेने पैसे परत करण्यासाठी नकार दिला. त्यामुळे आरोपीताने जाणीवपुर्वक मयत महिलेचा गळा आवळून खून केला असल्याचे सांगितले.

खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीताबाबत कोणत्याही प्रकारची माहीती नसताना महिला पोलीस पथकाने सखोल तपास करुन, तांत्रिक विश्लेषणाचा आधार घेऊन आरोपीताचे नांव निष्पन्न करुन, कौशल्यपुर्ण तपास करुन त्यास अटक करून उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.

सदरची कामगिरी ही मिलींद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई; संजय ऐनपुरे, पोलीस सह आयुक्त, नवी मुंबई; प्रशांत मोहीते, पोलीस उपायुक्त, परि ०३, पनवेल, नवी मुंबई; भाऊसाहेब ढोले, सहा. पोलीस आयुक्त सी, पनवेल विभाग, नवी मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि नितीन ठाकरे, सपोनि प्रज्ञा मुंढे, सपोनि सारिका झांझुणें, सपोनि प्रविण फडतरे, पोउपनि विनोद लभडे, पोउपनि हजरत पठाण, पोउपनि प्रियांका शिंदे, पोलीस हवालदार ज्योती दुधाणे, देवांगी म्हात्रे, महिला पोलीस शिपाई अर्चना देसाई, साधना पवार, ज्योती कहांडळ, सुप्रीया ढोमे, सुशीला सवार, तेजश्री काशिद, स्वाती पाचुपते, पोशि विशाल दुधे यांनी केली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आरएसएस - समता आणि हिंदुत्व यांच्यातील वैचारिक संघर्ष




भारताच्या सामाजिक विचारविश्वात दोन प्रवाह कायम एकमेकांना छेद देत आले आहेत. एक म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समतेचा आणि मानवमुक्तीचा विचार, आणि दुसरा म्हणजे आरएसएसचा हिंदुत्ववादी राष्ट्रवाद. या दोन विचारप्रवाहांचा संघर्ष हा केवळ इतिहासातील प्रसंग नसून, तो आजही भारतीय लोकशाहीच्या आत्म्याला आकार देणारा संघर्ष आहे. एकीकडे आंबेडकरांचा विवेकाधारित, वैज्ञानिक, समतेवर उभा विचार आहे; तर दुसरीकडे आरएसएसचा संस्कृतीकेंद्रित, बहुसंख्याकवादी दृष्टिकोन आहे. या दोन विचारधारांचा संघर्ष म्हणजे भारताच्या आत्म्याचा संघर्ष म्हणजे मानवतेचा विरुद्ध अधिराज्याचा! भारताच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक इतिहासात दोन प्रवाह सतत एकमेकांसमोर उभे राहतात. एक म्हणजे समतेचा आणि मानवमुक्तीचा विचार, ज्याचे प्रतिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत आणि दुसरा म्हणजे हिंदुत्वाचा विचार, ज्याचे प्रतिक राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) आहे. या दोन्ही विचारप्रवाहांमधील संघर्ष हा केवळ व्यक्तीगत नव्हता, तर तो भारतीय समाजाच्या आत्म्याशी संबंधित वैचारिक संघर्ष होता.

डॉ. आंबेडकर यांनी भारतातील हजारो वर्षांच्या जातिव्यवस्थेच्या विळख्यात अडकलेल्या समाजाला समतेचे आणि न्यायाचे स्वप्न दाखवले. त्यांचा समाजदर्शनाचा पाया होता मानव माणसाचा शत्रू नाही, सर्व माणसे समान आहेत. ते धर्माकडे अंधश्रद्धा म्हणून नव्हे, तर सामाजिक पुनर्रचनेचे साधन म्हणून पाहत होते. म्हणूनच त्यांनी स्पष्ट सांगितले. मी हिंदू धर्मात जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही. त्यांच्यासाठी धर्म म्हणजे मानवतेचा, समतेचा आणि न्यायाचा मार्ग. म्हणूनच त्यांनी बुद्ध धर्माचा स्वीकार केला, कारण तो विवेक, करुणा आणि समता शिकवतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समतेचे आणि मानवमुक्तीचे शिल्पकार होते.

एकात्मतेच्या नावाखाली सामाजिक अधिराज्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने १९२५ पासून भारतात हिंदू राष्ट्र या संकल्पनेचा प्रचार केला. संघाच्या दृष्टीने हिंदुत्व हे केवळ धर्म नव्हे, तर संस्कृती आणि राष्ट्रभावना आहे. पण या विचारात समता नव्हती, तर बहुसंख्याकत्व आणि संस्कृतीचे एकरूपत्व यावर भर होता. आरएसएसचा दृष्टिकोन असा होता की, भारतात राहणारे सर्व लोक हे हिंदू संस्कृतीचे वारसदार आहेत; त्यामुळे त्यांना हिंदू म्हणून स्वतःला ओळखले पाहिजे. हा विचार वरवर एकात्मतेचा भास देतो, परंतु प्रत्यक्षात जातिव्यवस्थेच्या पायावर उभ्या असलेल्या सामाजिक विषमतेला तो हात लावीत नाही. डॉ. आंबेडकर यांना हाच विरोध होता.

डॉ. आंबेडकर यांनी समाजाच्या रचनेत मूलभूत बदल करण्याची मागणी केली. ते म्हणाले, राजकीय स्वातंत्र्य मिळाले तरी सामाजिक आणि आर्थिक विषमता टिकली, तर ते स्वातंत्र्य टिकणार नाही. पण आरएसएसचा दृष्टिकोन वेगळा होता. त्यांच्या दृष्टीने संस्कृतीचे रक्षण हे सामाजिक बदलांपेक्षा अधिक महत्त्वाचे होते. या कारणाने डॉ. आंबेडकरांना आरएसएसचा हिंदुत्ववाद सामाजिक न्यायविरोधी वाटला. त्यांनी चेतावणी दिली होती की, हिंदू धर्माने जर आपले सामाजिक दोष दूर केले नाहीत, तर हा देश तुटेल. त्यांचा संघर्ष होता सत्तेसाठी नव्हे, तर समाजपरिवर्तनासाठी. डॉ. आंबेडकरांचा मार्ग म्हणजे विवेक, बंधुता, समता आणि न्याय तसेच आरएसएसचा मार्ग म्हणजे संस्कृती, राष्ट्रभक्ती, हिंदू एकात्मता. एका मार्गाचा उद्देश मानवाला मुक्त करणे होता, तर दुसऱ्याचा उद्देश संस्कृतीच्या चौकटीत सर्वांना सामावून घेणे हा होता. या दोन विचारसरणींच्या संघर्षातून भारतीय लोकशाहीचा चेहराच ठरला.

आजही समाजात धर्माच्या नावावर द्वेष पसरवला जातो, अल्पसंख्याकांवर अन्याय होतो, आणि जातिव्यवस्था नष्ट झाली नाही. या पार्श्वभूमीवर आंबेडकरांचा समतेचा संदेश आज अधिकच महत्त्वाचा ठरतो. त्यांनी सांगितलेला संविधान हा माझा धर्मग्रंथ आहे हा संदेश विसरता कामा नये. आरएसएसच्या हिंदू राष्ट्राच्या संकल्पनेपेक्षा डॉ. आंबेडकरांची मानव राष्ट्राची कल्पना अधिक व्यापक, न्यायपूर्ण आणि लोकशाहीप्रधान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आरएसएस यांच्यातील संघर्ष हा केवळ धार्मिक नव्हता, तर तो मानवमुक्ती विरुद्ध सामाजिक अधिराज्य यांच्यातील होता.

आंबेडकरांचा विचार हा समतेचा दीपस्तंभ आहे, जो भारतीय लोकशाहीला दिशा देतो; तर आरएसएसचा विचार हा एकरूपतेच्या अंधारात समाजाला मागे ओढणारा आहे. आजच्या पिढीने ठरवायचे आहे. आपण हिंदू राष्ट्राचे नागरिक होऊ इच्छितो का, की समतेच्या भारताचे नागरिक? डॉ. आंबेडकरांनी दाखवलेला मार्ग स्पष्ट आहे. समता, बंधुता आणि स्वातंत्र्य हेच खरे धर्माचे रूप आहे.

आजच्या भारतात संविधानाचे मूल्य आणि लोकशाहीचे तत्व यांवर प्रश्नचिन्ह उभे राहात असताना, डॉ. आंबेडकरांची समतेवरील श्रद्धा आणि बंधुत्वाचा संदेश पुन्हा जिवंत करणे अत्यावश्यक आहे. संविधानाचा धर्म आणि हिंदुत्वाचा विचार, हे दोन मार्ग आजही आपल्या समाजासमोर उभे आहेत. एक मार्ग न्याय, समानता आणि स्वातंत्र्याकडे नेतो; तर दुसरा मार्ग बहुसंख्याकतेच्या एकाधिकाराकडे. आता निर्णय आपल्या हातात आहे. आपण हिंदू राष्ट्राचे अनुयायी व्हायचे की समतेच्या भारताचे नागरिक व्हायचे? कारण इतिहास साक्ष आहे. ज्यांनी समतेचा मार्ग निवडला, त्यांच्याच हातात भविष्याचे लेखन असते.

**- प्रवीण बागडे**
**नागपूर, ९९२३६ २०९१९**

# थोडक्यात

## वॉक फॉर युनिटी कार्यक्रमात नागरिकांनी सहभाग नोंदवावा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, ठाणे :** सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती साजरी करण्यात येणार आहे. या जयंतीनिमित्ताने वॉक फॉर युनिटीचे कार्यक्रमामध्ये ५ किलोमिटर वॉक दि.३० ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ६.३० वाजता साकेत मैदान येथून सुरू करण्यात येवून त्याच ठिकाणी ड्राईव्ह परत येवून पूर्ण करण्यात येणार आहे.

ही ड्राईव्ह ठाणे पोलीस आयुक्तालय व ठाणे शहरातील नागरिकांच्या संयुक्त सहभागाने राबविण्यात येणार असल्याने या ड्राईव्हमध्ये ठाणे शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घेवून वॉक फॉर युनिटी या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन पोलीस मुख्यालय, ठाणे शहर राखीव पोलीस निरीक्षक यांनी केले आहे.

## नागपूरमध्ये शेतकरी मोर्चा... बच्चू कडूंच्या नेतृत्वाखाली हजारो शेतकऱ्यांची गर्दी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, नागपूर :** नागपूर शहरात आज प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने मोठा शेतकरी मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाचे नेतृत्व पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी स्वतः ट्रॅक्टर चालवत केले. शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी काढलेल्या या मोर्चात महादेव जानकर, रविकांत तुपकर यांसारखे प्रमुख नेते सहभागी झाले होते.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला आहे. मोर्चात प्रमुख मागण्या म्हणून शेतकऱ्यांना कर्जमाफी, शेतमालाला हमीभाव, मच्छीमार, दिव्यांग व शेतमजूर यांच्या समस्या सोडविण्याची मागणी करण्यात आली.

या मोर्चात हजारो शेतकरी ट्रॅक्टरसहित सहभागी झाले असून, शहापूर तालुक्यातूनही मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते. यात प्रहार जनशक्ती पक्ष तालुका अध्यक्ष वसंत पानसरे, सल्लागार रामचंद्र मडके, सल्लागार वामन केदार, सचिव विनायक बोंद्रे, युवा संघटक मयूर किरपण, नितीन कुडव, प्रवीण अंदाडे यांचा समावेश होता.

मोर्चामुळे नागपूर–हैदराबाद महामार्गावर ८ ते १० किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. संध्याकाळपर्यंत मागण्या मान्य झाल्या नाहीत तर मुख्यमंत्री निवासस्थान रामगिरी बंगल्यावर जाण्याचा इशारा बच्चू कडू यांनी भाषणादरम्यान दिला.

# पर्यावरण पूरक जीवनशैली आचरणात कधी आणणार ?

दिवाळीनिमित्त रस्त्याच्या कडेला कपड्यांचा सेल लागला होता. लोकांची स्वस्तात कपडे घेण्यासाठी अक्षरशः झुंबड उडाली होती. एकेक जण दहा, दहा कपडे घेत होता.या दिवाळीत लोकांनी कपडे, खाद्यपदार्थ आणि फटाक्यांवर अफाट खर्च केला. आता प्रत्येकाच्या घरात मोठमोठाले डबे भरून फराळाचे सामान ठेवलेले आहे. यातील बरेच फराळाचे पदार्थ वाया जाणार आहेत. कपाटामध्ये आधीच कपड्यांचा ढीग लागलेला असताना, दिवाळीत त्यात आणखी कपड्यांची भर पडली आहे. लाखो रुपयांचे फटाके उडवून त्याचा धूर काढण्यात आला. सांस्कृतिक परंपरा जपण्यासाठी आपण निसर्गाची एवढी मोठी हानी करत आहोत, याची पुसटशीही कल्पना आपल्याला नसते.

आपल्याला गरज असतानाच कपड्यांची खरेदी केली पाहिजे. यासाठी एक छोटेसे उदाहरण पाहूया. एक टी-शर्ट तयार करण्यासाठी तब्बल २७०० लिटर पाणी खर्च होते!

सेलमधील टी-शर्टचे पडलेले ढीग म्हणजे गावांला पाणीपुरवठा करणारी मोठाली टाकी ओतून केलेला माल आहे. हे लक्षात घेणं आवश्यक आहे.

पर्यावरणाचा ऱ्हास करून सुख मिळवण्यात आपण मश्गूल आहोत. आपली बौद्धिक आणि सांस्कृतिक भूक प्रचंड वाढली आहे. पूर्वी महिन्याला एक जीबी डेटा वापरणाऱ्यांना आता दिवसाला दोन जीबी डेटा देखील कमी पडतो.

या सर्वाचा परिणाम म्हणजे नुसता भारताचा विचार केला तरी वार्षिक दरडोई कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण दोन मेट्रिक टन इतके आहे. हे १४० कोटी लोकसंख्येने गुणिले, तर मिळणारा आकडा धडकी भरवणारा आहे. याचा परिणाम म्हणजे पृथ्वी अधिकाधिक गरम होत आहे आणि हवामानचक्र बदलत आहे. अवकाळी पावसामुळे प्रचंड नुकसान होत आहे.

खाणे, फिरणे, अति प्रमाणात मनोरंजन आणि खरेदी करणे हीच आज आपली लाइफस्टाईल बनली आहे. पुनर्वापर, काटकसर, साधी राहणी हे विचार आता गावंढळ वाटू लागले आहेत. यासाठी गौतम बुद्धांची एक प्रेरणादायी गोष्ट आपल्याला मार्गदर्शक ठरेल.

एकदा एक भिक्षू गौतम बुद्धांकडे आला आणि त्याने सांगितले की त्याला नवीन शाल हवी आहे.

बुद्धांनी विचारले, तुझ्याकडची आधीची शाल कुठे गेली?

भिक्षू म्हणाला, ती खूप जीर्ण झाली म्हणून मी ती गादीवरची चादर म्हणून वापरतो.बुद्धांनी पुढचा प्रश्न विचारला, मग गादीवरची जुनी चादर?भिक्षू म्हणाला, ती पार फाटली म्हणून मी ती कापून उशीचा आभ्रा केला.बुद्ध विचारतात, उशीचा जुना आभ्रा?भिक्षू म्हणतो, डोके घासून घासून त्याला भोक पडलं, म्हणून मी त्याचं पायपुसणं केलं. आणि जुनं पायपुसणं? बुद्ध विचारतात. भिक्षू हसून म्हणतो, त्याच्या चिंध्या झाल्या होत्या, म्हणून मी धागे उसवून काढले आणि त्याची वात केली. तीच वात मी कितीतरी दिवस वापरली. हे ऐकून बुद्ध हसले आणि त्यांनी त्या भिक्षूला नवीन शाल दिली.

या गोष्टीतून पुनर्वापर, काटकसर आणि साधी राहणी या पर्यावरणपूरक मूल्यांचा सुंदर बोध होतो.

आपल्याला जगण्यासाठी किती कपडे लागतात? दररोज किती अन्न लागते? किती वीज आणि पाणी लागते? याचे गणित आपण कधी मांडले आहे का?

खरं तर, आपल्याला ८५ ते ९० कपडे ऊन, वारा आणि पाऊस यापासून रक्षण करण्यासाठी पुरेसे आहेत. त्यापेक्षा जास्त कपडे बाळगणे म्हणजे चंगळवाद होय.साधारणपणे, प्रौढ व्यक्तीला दिवसाला १५०० ते २५०० किलो-कॅलरी अन्नाची गरज असते. यापेक्षा जास्त खाणे म्हणजे आधाशीपणा होय.

साधी राहणी, उच्च विचारसरणी ही जीवनशैली स्वीकारण्याची वेळ आता आली आहे.आपल्या चंगळवादी वृत्तीमुळे आपण येणाऱ्या पिढ्यांच्या आणि इतर सजीवांच्या ताटातील ओरबडून खात आहोत, याची जाणीव होणे आवश्यक आहे.

आपले सण-उत्सव आणि एकूणच रोजचे जीवन पर्यावरणपूरक करण्याकडे आपण जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे. तरच या जीवसृष्टीचे अस्तित्व टिकून राहील.

**- किशोर जाधव सोलापूर**
**मो. नं. ९९२२८८२५४१**

# चिमूर वनपरिक्षेत्रातील वाघाचा कहर ! वाघाच्या हल्ल्यात शेतकरी ठार, गावात प्रचंड संताप

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चिमूर (चंद्रपूर) :** चिमूर वनपरिक्षेत्रांतर्गत येत असलेल्या डोमा बीटातील शिवरा गावात वाघाच्या हल्ल्याने पुन्हा एकदा दहशत निर्माण केली आहे. रविवार (दि.२६ ऑक्टोबर) ला सायंकाळच्या सुमारास ही घटना घडली असून, ६० वर्षीय निलकंठ भुरे हे शेतकरी आणि शिवरा गावचे माजी सरपंच वाघाच्या हल्ल्यात ठार झाले आहेत. विशेष म्हणजे, याच परिसरात अवघ्या एका महिन्यात वाघाच्या हल्ल्यातील ही दुसरी घटना आहे, ज्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.



निलकंठ भुरे हे शंकरपूर-चिमूर रस्त्यावरील त्यांच्या शेतामध्ये पिकाची पाहणी करण्यासाठी सायंकाळी चार ते पाच वाजताच्या दरम्यान गेले होते. रात्री आठ वाजेपर्यंत ते घरी न परतल्याने कुटुंबियांनी शेतात शोध घेतला. शेतात त्यांची सायकल दिसल्यामुळे कुटुंबियांना शंका आली. गावातील ३० ते ४० लोकांना सोबत घेऊन पुन्हा शोधमोहीम राबवल्यानंतर रात्री ११ वाजता त्यांचा मृतदेह खाल्लेल्या अवस्थेत नाल्या किनारी आढळून आला. वाघाने हल्ला करुन त्यांचे शरीर ओढत नेले होते आणि त्यांचे दोन्ही पाय खाल्ले होते.

**लोकप्रतिनिधींची धाव, रात्री दीड वाजता आश्वासन...**



घटनेची माहिती मिळताच चिमूर वनविभाग आणि भिसी पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. मात्र, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. सतीश वारजूरकर, पंचायत समितीचे माजी उपसभापती रोशन ढोक आणि सरपंच अतुल नन्नावरे यांच्यासह ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली. जोपर्यंत वरिष्ठ वन अधिकारी घटनास्थळी येऊन वाघाचा तात्काळ बंदोबस्त करण्याचे आणि कुटुंबाला योग्य आर्थिक मदत देण्याचे आश्वासन देत नाहीत, तोपर्यंत मृतदेह शवविच्छेदनासाठी नेऊ दिला जाणार नाही, असा पवित्रा त्यांनी घेतला.

अखेर सोमवारी पहाटे दीड वाजता चिमूर वनपरिक्षेत्र अधिकारी किशोर देऊळकर घटनास्थळी दाखल झाले. त्यानी वाघाचा बंदोबस्त करण्याचे आणि रु १० लाख मदत देण्याचे आश्वासन दिले. यानंतर रु ३० हजार रोख आणि रु ९ लाख ७० हजार चा धनादेश कुटुंबियांना तत्काळ सुपूर्द करण्यात आला. त्यानंतर मृतदेह उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला.

या घटनेमुळे चिमूर परिसरात वाघाची दहशत शिगेला पोहचली असून, वनविभागाने तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी जोर धरु लागली आहे.

# 'दक्षता जनजागृती सप्ताह' निमित्त कोकण भवनात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी घेतली शपथ

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, नवी मुंबई :** जीवनाच्या सर्व क्षेत्रात सच्चेपणा आणि कायद्याचे पालन करेन, लाच घेणार नाही आणि लाच देणार नाही, सर्व कामे प्रामाणिकपणे आणि पारदर्शक पध्दतीने करेन, जनहितासाठी कार्य करेन अशी प्रतिज्ञा घेऊन भ्रष्टाचाराविरुध्द जनजागृती होण्याच्या उद्देशाने आज कोकण भवनमध्ये 'दक्षता जनजागृती सप्ताहाचा' प्रारंभ करण्यात आला. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या बैठक सभागृहात सकाळी ११.०० वाजता कोकण भवनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ घेतली.

दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात येते, त्या सप्ताहात दक्षता जनजागृती सप्ताह साजरा केला जातो. सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा आणि सत्यनिष्ठा याबद्दलच्या दृढनिश्चयाचे बळकटीकरण करण्यासाठी नागरिकांच्या सहभागाने हा सप्ताह साजरा करण्यात येतो. यंदाच्या २०२५ या वर्षी केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार २८ ऑक्टोबर ते ०३ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत या 'दक्षता जनजागृती सप्ताहाचे' आयोजन करण्यात आले आहे.

उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ घेतली. यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त जनतेला संदेशाचे वाचन केले. कोकण भवनमधील विविध कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.